
# मराठा समाजाला झुकते माप! मात्र, ओबीसी विद्यार्थ्यांना तीन वर्षांपासून शिष्यवृत्ती नाही!!

बीड ● शनिवार, दिनांक १३ डिसेंबर २०२५ ● वर्ष २० वे ● पाने ४
http://epaper.beedvastav.com https://www.beedvastav.com Email:beedvatsav@gmail.com ●किंमत ३ रुपये

स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI:Regd.No.MAH/MAR/2010/43846

वास्तव



भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

सन्मानाची २० वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# सरकारच्या हाताला लकवा झाला काय?

# राज्याची आर्थिक स्थिती चांगली म्हणता मग 3 वर्षांपासून शिष्यवृत्ती का दिली नाही?

- निवडणुकीपूर्वी सर्वच समाजातील विद्यार्थ्यांसाठी योजना लागू असताना केवळ ओबीसी विद्यार्थ्यांनाच यापासून वंचित ठेवले!
- मागील व्यवस्थापकीय संचालकांनी अधिछात्रवृत्ती वितरणात भेदभाव केल्यामुळे महाज्योती अंतर्गत विद्यार्थ्यांवर अन्याय!!
- बार्टी व सारथी संस्थेतील विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून अधिछात्रवृत्ती वितरित मात्र महाज्योतीचे विद्यार्थी अद्यापही वंचित!!

## सारथीच्या विद्यार्थ्यांना आवश्यक तेवढा निधी मग ओबीसी विद्यार्थ्यांवर अन्याय का?

**नागपूर : प्रतिनिधी**
विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारने महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेमध्ये तीन वर्षांपूर्वी पीएचडी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती देण्याचा निर्णय घेतला होता. बार्टी आणि सारथीच्या विद्यार्थ्यांना नियमित अधिछात्रवृत्ती दिली जाते. महाज्योतीच्या विद्यार्थ्यांना ती अद्यापही लागू न झाल्याने संशोधन विद्यार्थ्यांनी थेट व्यवस्थापकीय संचालकांच्या कार्यालयात ठिय्या दिला. यावेळी सरकार विरोधात घोषणाही देण्यात आल्या. त्यामुळे राज्य सरकार सारथीच्या विद्यार्थ्यांना आवश्यक तेवढ्या निधी देत असताना ओबीसी विद्यार्थ्यांवर अन्याय का करतो? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे निवडणुकीपूर्वी सर्वच समाजातील विद्यार्थ्यांसाठी योजना लागू झाली असतानाही केवळ ओबीसी विद्यार्थ्यांनाच यापासून वंचित ठेवण्यात आले आहे, असा ओबीसी विद्यार्थ्यांनी आरोप केला आहे.

### तीन वर्षांच्या संघर्षानंतर विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती मंजूर पण निधी नाही!!

● विद्यार्थ्यांनी या संदर्भात निवेदन दिले आहे. त्यानुसार तीन वर्षांपूर्वी विद्यार्थ्यांची पीएचडी नोंदणी झाली असून संघर्षानंतर शासनाने अधिछात्रवृत्ती मंजूर केली. अधिछात्रवृत्ती नोंदणी दिनांकापासून आणि शंभर टक्के दराने देण्यात येईल, असे 23 सप्टेंबर 2024 रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार जाहीर करण्यात आले. यात महाज्योती संस्थे अंतर्गत नोंदणीकृत विद्यार्थ्यांना तसेच सारथी संस्थेतील विद्यार्थ्यांनाही तितकाच लाभ देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.



सारथी VS महाज्योती ज्ञानदीप समतेचा

### महाज्यतीचे विद्यार्थी अद्यापही लाभापासून वंचित

➤ बार्टी, सारथी आणि महाज्योती या तिन्ही संस्थांसाठी सन 2022 पासून अनुसूचित जाती, भटके विमुक्त, ओबीसी तसेच अल्पसंख्यांक समाजातील पीएचडी विद्यार्थ्यांसाठी समान धोरण निश्चित करण्यात आले. असे असताना मागील व्यवस्थापकीय संचालकांनी अधिछात्रवृत्ती वितरणात भेदभाव केल्यामुळे महाज्योती अंतर्गत विद्यार्थ्यांवर अन्याय झाला. बार्टी व सारथी संस्थेतील विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून अधिछात्रवृत्ती वितरित करण्यात आली. तर महाज्यतीचे विद्यार्थी अद्यापही लाभापासून वंचित आहेत, असे विद्यार्थ्यांनी त्यांच्या निवेदनात नमूद केले आहे.

### वित्त विभागाच्या दिरंगाईचा फटका

मागील दोन वर्षांपासून संस्थेकडून शासनास प्रस्ताव सादर केला जात आहे. 25 जुलै 2025 रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत 2023 मधील विद्यार्थ्यांचे प्रलंबित अधिछात्रवृत्ती अदा करण्याबाबत वित्त विभागास स्पष्ट निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागाने वित्त विभागास तसा प्रस्ताव सादर केला. मुख्य सचिवांचे स्पष्ट आदेश असूनही वित्त विभागाने कोणतीही भूमिका न घेतल्याने विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्याचा आरोप आहे.

विकासाकडे वाटचाल ➤ डॉ.हारुणभाई इनामदार व डॉ. सौ. सीताताई बनसोड यांच्या प्रयत्नाला यश

## उमरी रोड भागातील नागरिकांचा लाईटचा प्रश्न अखेर मार्गी

➤ **केज :** केज शहरातील उमरी रोड परिसरामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून या परिसरातील नागरिकांना सुरळीतपणे लाईट नसायची या भागात लाईटचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा बनला होता. परंतु याकडे कोणी लक्ष देत नव्हते. काही नागरिकांनी लाईटचा प्रश्न हा राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा गटनेते डॉ. हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड यांच्याकडे मांडला. उमरी रोड परिसरातील वाढती लोकसंख्या व या भागात अतिशय कमी दाबांमध्ये विज उपलब्ध असायची सातत्याने डीपी जळायचा तर काही वेळा डीपी मध्ये बिघाड असायचा तर काही वेळा फ्युज नसायच्या अशा अनेक अडचणींना या भागातील नागरिकांना सामोरे जावे लागत होते.

महावितरण कार्यालयाकडून अनेक वेळा नवीन डीपी मंजूर झालेला असताना जाग्या अभावी नवीन डीपी बसवता येत नव्हता, या भागात नवीन डीपी बसवण्यासाठी जाग्याचा प्रश्न उद्भवत होता परंतु गटनेते डॉ.हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड यांनी महावितरण कार्यालयाशी संपर्क साधून सतत पाठपुरावा करून व इरिगेशन कार्यालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याशी संपर्क करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना विनंती करून त्यांच्या कार्यालयाच्या पाठीमागील बाजूस नवीन डीपी बसवण्यासाठी जागा देण्याची विनंती करून पाठपुरावा केला. इरिगेशन कार्यालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी डीपी बनवण्यासाठी जागा देण्याचा शब्द हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांना दिला. शुक्रवार रोजी प्रत्यक्षात डीपीच्या कामाला सुरुवात करण्यात आली. यापुढे उमरी रोड भागातील व परिसरातील नागरिकांचा लाईटचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. या भागात नवीन डीपी बसवण्यासाठी जागेचा मोठा प्रश्न होता तो प्रश्न डॉ.हारुणभाई इनामदार व डॉ. सौ. सीताताई बनसोड यांनी मार्गी लावला. गटनेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या प्रयत्नाला यश आले आहे असे या भागातील नागरिक डीपीचे काम चालू असताना बोलत होते. गटनेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांनी लाईटचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावल्याबद्दल या भागातील नागरिकांनी त्यांचे आभार व्यक्त केले.





## केज येथील कृष्णा डायग्नोस्टिक उत्कृष्ट आरोग्य सेवेबद्दल एनएबीएचकडून सन्मान

➤ **केज/ प्रतिनिधी**
केज येथील उपजिल्हा रुग्णालयात कृष्णा डायग्नोस्टिक लि. सिटीस्कॅन सेवा देणाऱ्या या खाजगी कंपनीस रुग्णांना उत्कृष्ट सेवा दिल्याबद्दल न्यू दिल्ली एन ए बी एच यांच्याकडून सन्मानपत्र प्राप्त झाले. उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ दत्तात्रय केंद्रे, स्त्री रोग तज्ञ डॉ इंगोले, डॉ हनुमंत सौदागर यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

मॅनेजर विवेकानंद स्वामी, तंत्रज्ञ अशोक दहिफळे, बाजीराव चाटे, अभिजित थोरात, सिद्धार्थ मुंडे, ज्ञानदेव मुंडे सुषमा सोनवणे यांनी दिलेल्या ● पान ३ वर...



## आजचे राशि भविष्य

### मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

### कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

### तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

### वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

### धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वतःच्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

### मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# आयुष्याचे अनिश्चित क्षण: एक विस्तृत अंतर्दृष्टी



विशेष



अन्वर शेख,
● प्राचार्य, सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगाव.

चालता वाट पुढे भय वाटते चित्ती ।
बहुत जन गेले नाही आले मागुती ।।

मागच्या आठवड्यात मृत्यूच्या बातम्यांचा एक विचित्र महापूर आला होता. जणू काही अदृश्य हातांनी आयुष्याचे धागेदोरे आपल्या हाती घेतले असावेत. हा काळ एवढा त्रासदायक होता की प्रत्येक बातमी मनाला एक नवा धक्का देत होती. माझे नवी मुंबई स्थित मूळचे मानवत चे मित्र डॉ. राम भिसे यांच्या वडिलांचे निधन, जे त्यांच्या कुटुंबासाठी अपरिपूर्ण शून्य निर्माण करते. सरस्वती इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी नवी मुंबई येथे प्राचार्य म्हणून कार्यरत असलेले मित्रवर्य दिगंबर सुरोशे यांच्या बंधूचे अचानक निधन, जो सामाजिक वर्तुळात एक मोठा आघात ठरला. माझे सिंदफणा शाळेतील सांस्कृतिक विभाग प्रमुख सहकारी मित्र सखाराम जोशी यांच्या बंधूंचे निधन, जो एका कुटुंबाच्या भावनिक पार्श्वभूमीत एक मोठा धक्का ठरला. हिंगोली जिल्ह्यातील आमच्या मेथा गावातील माजी सरपंच राजू लोंढे यांच्या मुलाचे निधन, जो स्थानिक समाजाला हादरून टाकणारा प्रसंग होता. आणि शेवटी, आमच्या सिंदफणा शाळेतील मेस मधील लक्ष्मी मावशी यांच्या मुलाचा अपघाती मृत्यू, जो कोणत्याही माणसाला अंतःकरणापर्यंत हादरून टाकील.

"मृत्यू हा जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे, पण तरीही तो आपल्याला कधीही संपूर्णपणे स्वीकारता येत नाही." महात्मा गांधींच्या या विचारात जीवनाचे एक गहन सत्य लपलेले आहे. आपण रोजच्या गदगदाटात, व्यावसायिक स्पर्धेत, आणि वैयक्तिक संघर्षांमध्ये इतके गुंतलेले असतो की आपण जीवनाच्या क्षणभंगुर स्वभावाकडे दुर्लक्ष करतो. आपण भांडतो, वादाचे प्रसंग उभे करतो, तुझं माझं असे म्हणत वेळ घालवतो. पण खरंतर, आपल्याला माहीत नाही की पुढचा क्षण कधी येईल. जीवनाच्या या अनिश्चिततेमध्ये, मानवी संबंध हे सर्वात मौल्यवान ठरतात. आपण किती वेळा एखाद्या नातेवाईकाशी, मित्राशी, किंवा कुटुंबातील सदस्याशी भांडतो, त्याचा पश्चाताप करतो. पण जेव्हा ते अचानक निघून जातात, तेव्हा आपल्याला त्यांच्याबद्दलचे प्रेम, त्यांच्याबद्दलची आठवण परत येते. रवींद्रनाथ टागोर म्हणतात, "जो माणूस प्रेमाने जगतो, तोच खरा जीवन जगतो."

बुद्ध भगवानाचे शब्द आठवतात – "वर्तमान क्षण हाच एकमेव शाश्वत सत्य आहे." आपण भूतकाळाच्या आठवणींत किंवा भविष्याच्या चिंतेत इतके गुंतलेले असतो की वर्तमान क्षणाचे सौंदर्य विसरतो. प्रत्येक श्वास, प्रत्येक क्षण हा एक अनमोल भेट आहे. आपण त्याचा योग्य उपयोग करत नाही, त्याचा सन्मान करत नाही. मृत्यू हा केवळ एक शारीरिक अंत नसून तो जीवनाचे एक गहन परावर्तन आहे. तो आपल्याला सांगतो की आपण किती क्षणभंगुर आहोत, किती अल्पजीवी आहोत. आपल्या व्यक्तिगत संघर्षांपेक्षा, राजकीय मतभेदांपेक्षा, आर्थिक स्पर्धांपेक्षा महत्त्वाचे काही आहे – ते म्हणजे एकमेकांवरील प्रेम, करुणा आणि सहानुभूति.

सर्व धार्मिक परंपरांतून जीवनाचे सार सांगितलेले आहे. भगवतगितेत श्रीकृष्ण सांगतात, "जसे माणूस जुने कपडे काढून नवे घालतो, तसेच आत्मा देह बदलतो. अविनाशी आत्मा कधीही मरत नाही." या विचारात जीवनाचे एक गहन रहस्य लपलेले आहे. हिंदू तत्त्वज्ञानानुसार, मृत्यू हा शेवट नसून एक नव्या प्रवासाची सुरुवात आहे. जन्म–मृत्यूचे चक्र (संसार) हा एक अनंत प्रवास आहे, जिथे आत्मा सतत प्रगती करत असतो. बुद्ध भगवानाचे शब्द अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत – "जीवन क्षणभंगुर आहे, आणि सर्व दुःख या क्षणभंगुरतेतूनच येते." बौद्ध तत्त्वज्ञान मानते की दुःख आणि सुख दोन्ही अस्थायी असतात. महत्त्वाचे म्हणजे वर्तमान क्षणाशी जागरूक राहणे, त्याचा पूर्ण आनंद घेणे. बायबलमध्ये योहान सुवार्तेत म्हटले आहे, "मला जीवन ख्रिस्तामध्ये आहे, आणि मृत्यू माझ्यासाठी लाभ आहे." ख्रिश्चन धर्म मृत्यूला एक नव्या जीवनाची सुरुवात मानतो, जिथे आत्मा परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करतो. कुराणमध्ये म्हटले आहे, "प्रत्येक जीव मृत्यूचा स्वाद चाखणार आहे." इस्लाम मानतो की मृत्यू हा अल्लाहचा एक नियम आहे, आणि प्रत्येक जीवाचा एक निश्चित मुक्ती काल असतो. गुरु ग्रंथ साहिबमध्ये म्हटले आहे, "जो जन्म घेतो, तो मरणार आहे." शीख धर्म मानतो की जीवन हा एक ईश्वरी लीला आहे, आणि मृत्यू हा केवळ एक प्रवास आहे. महावीर स्वामींच्या तत्त्वानुसार, "जीवन म्हणजे कर्माचा एक प्रवास." जैन धर्म मानतो की प्रत्येक कर्म आपल्या पुढच्या जन्माला आकार देते.

या सर्व धार्मिक परंपरांमधून एक समान संदेश येतो – जीवन हे क्षणभंगुर आहे, पण त्याचबरोबर अत्यंत मौल्यवान आहे. प्रत्येक क्षण हा एक अनमोल संधी आहे प्रेम करण्याची, माफ करण्याची, जगण्याची. मागच्या आठवड्यातील सर्व दुःखद घटनांनी आपल्याला एक महत्त्वाचा संदेश दिला आहे – आपण एकमेकांवर प्रेम करू, एकमेकांना समजून घेऊ, क्षमा करू. कारण आपल्याला माहीत नाही की पुढचा क्षण कधी येईल. "जीवन हा देवाने दिलेला सर्वात मोठा उपहार आहे. त्याचा सन्मान करा, त्याचा आनंद घ्या आणि प्रेमाने जगा.

अल्प आयुष्य मानव देह ।
शत गणिले ते अर्ध रात्र खाय ।क्षणभंगुर नाही भरंवसा ।
व्हा रे सावध सोडा माया आशा .....

# नागझरी (गायमुख) गावाचे पुनर्वसन 38 वर्षांपासून प्रलंबित

**अधिका-यांच्या उदासीनतेमुळे ९ डिसेंबरची जिल्हाधिकारी बैठकही निष्फळ** | **न्यायाच्या प्रतीक्षेत आमची एक पिढी मातीत गेली - बाबाराव मुरकुटे** | **पुनर्वसन प्रकरण शासनाच्या लालफितीत अडकलं** | **सूचना न पाठवल्याने जिल्हा पुनर्वसन अधिका-यांना जिल्हाधिका-यांची फैलावर** | **ग्रामस्थांचा दशकांपासून सुरू असलेला संघर्ष अद्यापही थांबलेला नाही**





➤ **माजलगाव : अरविंद ओव्हाळ**

कुंडलिका प्रकल्पामुळे १९८६ मध्ये विस्थापित झालेल्या नागझरी (गायमुख) गावाचे पुनर्वसन आज ३८ वर्षांनंतरही रखडलेले आहे. संबंधित विभागांची उदासीनता, अधिका–यांचा जबाबदारी टाळण्याचा पवित्रा आणि पुनर्वसनाशी संबंधित कागदपत्रांची अनुपलब्धता यामुळे हे प्रकरण अद्याप शासनाच्या लालफितीतच अडकून आहे.

या प्रकरणात ९ डिसेंबर रोजी जिल्हाधिका–यांच्या उपस्थितीत महत्त्वाची बैठक बोलावण्यात आली होती. मात्र, जिल्हा पुनर्वसन अधिकारी सूर्यवंशी यांनी माजलगाव, धारूर आणि केजच्या तहसीलदारांना तसेच अर्जदार बाबाराव मुरकुटे यांनाही बैठकीची कोणतीही सूचना पाठवली नाही. परिणामी बैठक निष्फळ ठरली असून जिल्हाधिका–यांनी पुनर्वसन अधिका–यांना याबाबत चांगलेच फैलावर घेतल्याची माहिती मिळते.

### 39 मुद्द्यांची निवेदने, तरीही दुर्लक्ष कायम

● नागझरी (गायमुख) गावातील रहिवाशांनी मागील चार दशकांपासून शासनदरबारी खेटे मारत पुनर्वसनाच्या सुविधा मिळाव्यात म्हणून सातत्याने पाठपुरावा केला.

### लोकप्रतिनिधी आणि विभागांचे दुर्लक्ष — ग्रामस्थांचा आरोप

● स्थानिक लोकप्रतिनिधींपासून ते पुनर्वसन विभाग, उपविभागीय अधिकारी आणि तहसिलदार— सर्वांनीच या प्रलंबित पुनर्वसन प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे विस्थापित गावाचे अस्तित्वच धोक्यात आल्याची भीती व्यक्त केली जाते.

### हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी मांडावी



● "गेल्या अनेक दशकांपासून आम्ही नागझरी (गायमुख) गावासाठी योग्य पुनर्वसनाची मागणी करत आहोत. आमच्या एक संपूर्ण पिढीचा संघर्ष व्यर्थ गेला तरी आम्हाला न्याय मिळालेला नाही. दररोजचा उदरनिर्वाह आणि पुनर्वसनासाठीचा पाठपुरावा यात आर्थिक अडचणींचा मोठा सामना करावा लागतो. सध्या सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात आमच्या प्रश्नावर तात्काळ लक्ष देत पुनर्वसनाची मागणी लोकप्रतिनिधींनी जोरदारपणे मांडावी."

● **बाबाराव मुरकुटे**, रहिवासी, नागझरी (गायमुख)

- **केज तहसीलदारांना — १३ मुद्दे**
- **धारूर तहसीलादारांना — ४ मुद्दे**
- **माजलगाव तहसीलदारांना — २६ मुद्दे**

अशी एकूण ४३ मुद्द्यांची निवेदने देण्यात आली; परंतु संबंधित अधिका–यांनी ती दखल न घेता वारंवार दुर्लक्ष केले. स्थिती बिकट झाल्याने विभागीय आयुक्तांकडे ३९ मुद्द्यांचे विशेष निवेदन पाठवण्यात आले. आयुक्तांनी २१ मे २०२४ आणि १ जानेवारी २०२४ रोजी पुनर्वसित गावाची सद्यस्थिती अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले होते, मात्र तो अहवाल आजतागायत सादर झालेला नाही.

# बँक मित्र संघटनेचा आज न्याय हक्कासाठी नागपूर विधान भवनावर धडक मोर्चा

➤ मित्र संघटनेला एकत्र घेऊन देविदास तुळजापूरकर यांनी मोर्चाचे नेतृत्व करून दिले मुख्यमंत्र्यांना निवेदन

➤ **नागपूर/प्रतिनिधी**

नागपूर येथे महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातून बँक मित्र जमा होऊन न्याय हक्कासाठी विधान भवनावर धडक मोर्चा काढून बँक मित्रांच्या व्यथा देविदास तुळजापूरकर यांनी सरकारच्या निदर्शनास आणून दिल्या. विविध मागण्याचे निवेदन मुख्यमंत्री यांच्याकडे सादर केले.

यावेळी महाराष्ट्रातून विविध संघटनेने जाहीर पाठिंबा दिला यावेळी बोलताना तुळजापूर यांनी बँक मित्रांना यापुढे मुंबई येथे मोर्चा काढण्याचा जाहीर केले. यावरही शासनाला जाग न आल्यास २०२६ मध्ये दिल्ली येथील जंतर–मंतर या ठिकाणी आपण जाणार असल्याचे सांगितले व बँक मित्रांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात डोंगराळ भागात, अति ग्रामीण वस्त्यांत, उन्हात, वाऱ्यात, मुसळधार पावसात दिवसाचे चोवीस तास, आठवड्याचे सातही दिवस, वर्षाचे ३६५ दिवस अखंड सेवा करणारे आम्ही बैंक मित्र, आज नाईलाजास्तव रस्त्यावर आलो आहोत.

कारण आमची वेदना, आमची कैफियत, आमचा संघर्ष सरकारपर्यंत आणि समाजापर्यंत पोहोचवणे आता जीवन–मरणाचा प्रश्न बनला आहे. आम्ही कामाचे तास पाहिले नाहीत पण आमच्यासाठी कोणतेही हक्क नाहीत. रजा नाही, साप्ताहिक सुट्टी नाही, किमान वेतन नाही, कोणतीही सेवा–सुरक्षितता नाही, मेडिकल नाही, वार्षिक वाढ नाही,




अपघात /जीवन विमा नाही, कामासाठी जागा आम्ही देतो, मशीन, लॅपटॉप, डेटा, स्टेशनरी सगळे आमचेच प्रवास खर्च आमचा आणि मिळकत तुटपुंजी !त्यातही, जिथे एक बँक मित्राचा उदरनिर्वाह होत नाही, तिथे ठेकेदारांनी दोन–चार नवे बँक मित्र नेमल्याने आमचे उत्पन्न आणखी कोसळले. अनेकजण १०–१५ वर्षे अखंड काम करत आहेत पण त्याचे फळ? उत्पन्न कमी, ताण वाढलेला !

अनेक बँक मित्रांनी हताश होऊन काम सोडले, तर काहींनी सर्व्हिस प्रोव्हायडरच्या जाचाला कंटाळून आपले आयुष्य संपवले – ही वेदनादायक वस्तुस्थिती आहे. अशा या परिस्थितीत आमच्या अस्तित्वासाठी आम्ही संघटनात्मक पातळीवर उभे राहिलो. महाराष्ट्रातील सर्व बँक मित्र एकत्र येऊन स्थापन केलेल्या आमच्या संघटनेला एक वर्ष पूर्ण झाले आहे. आज आम्ही राज्याचे मुख्यमंत्री राज्य बँकर्स समितीचे अध्यक्ष आणि जनतेचे पालक यांच्या दरवाजात उभे आहोत. फक्त एवढ्यासाठी की "आम्हाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळावा" आमचे योगदान विसरू नका, आज राज्यातील वीस हजारांहून अधिक बँक मित्र सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या माध्यमातून कार्यरत आहेत.

राज्य सरकारच्या प्रत्येक कल्याणकारी योजनेत आमची भूमिका अनन्यसाधारण आहे. कोरोना महामारीच्या काळात आम्ही जीव धोक्यात घालून सेवा केली. नोटबंदीच्या काळात घाबरलेल्या जनतेला आम्ही आधार दिला. लाडकी बहीण योजना, किसान कल्याण, गरीब कल्याण डीबीटी, या सर्व योजना जनतेपर्यंत पोहोचवण्यामध्ये बँक मित्रांची महत्त्वाची भूमिका सिद्ध झाली आहे. आज आम्ही सरकार, सर्व राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी आणि जनतेपुढे हात जोडून आवाहन करत आहोत. आमची वेदना, आमचा संघर्ष ऐका. आमचा आवाज सरकार आणि बँकर्सपर्यंत पोहोचवा. आम्हाला किमान मानवी हक्क मिळवून द्या. आमच्या कार्याचा सन्मान करून, आमच्यासाठी सुरक्षित आणि सन्मानजनक जीवनाची हमी द्या. आम्ही ही या समाजाचेच घटक या राज्याचेच नागरिक. आमच्यासुद्धा हातावर मुले–बाळं आहेत, कुटुंब आहे, आमचे स्वप्नं आहेत, आणि साधेपणाने "सन्मानाने जगण्याचा हक्क" आहे. आज आम्ही लढत आहोत फक्त आपल्यासाठी केलेल्या आमच्या सेवेला न्याय मिळावा म्हणून. आपण आमच्यासोबत उभे राहाल हीच आमची आशा आणि विश्वास आहे. आपले महाराष्ट्र राज्यातील तमाम बँक मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांज दैनिक बीड
वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक –अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

सांज दैनिक बीड
# वास्तव
भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित
एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट





## २५ ऑक्टोबर १९३९ रोजी मुंबईच्या विल्सन हायस्कूलमधील बैठक निर्णायक

१९३९ च्या सप्टेंबरमध्ये भा. वि. वरेरकर, लालजी पेंडसे, अनंत काणेकर, गो. बा. महाशब्दे यांच्यासारखे काही मान्यवर, 'मराठी पुरोगामी लेखक संघा'च्या बैठकीच्या निमित्तानं एकत्र आले होते. बैठकीत या सर्वांनी लेखक संघाप्रमाणं संपादक, उपसंपादकांचे एक संमेलन बोलावून ठोस अशी काही तरी योजना अंमलात आणावी असा निर्णय घेतला. ही सारी मंडळी मग केवळ चर्चा करूनच थांबली नाही तर संपादक, उपसंपादक आणि बातमीदारांची एक बैठक २५ ऑक्टोबर १९३९ रोजी मुंबईच्या विल्सन हायस्कूलमध्ये बोलावण्यात आली. भा. वि. वरेरकर या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या बैठकीस १९ नियतकालिकांचे संपादक, उपसंपादक उपस्थित होते. बैठकीत पत्रकारिते समोरील विविध प्रश्नांवर सांगोपांग चर्चा झाली. पत्रकारांच्या स्थितीवरही अनेकांनी मतं व्यक्त केली. ही सारी परिस्थिती बदलायची असेल तर सामुहिक प्रयत्नांची गरज आहे आणि त्यासाठी एखादं प्रभावी व्यासपीठ असलं पाहिजे यावर उपस्थितांचं एकमत झालं. पत्रकारांची ही संघटना महाराष्ट्रव्यापी असावी असंही बैठकीत ठरलं. मराठी पत्रकार परिषदेची मुहूर्तमेढ इथंच रोवली गेली. संघटना स्थापन करताना पत्रकारांचं महाराष्ट्र पातळीवरचं एक अधिवेशन किंवा परिषद भरविली जावी अशी सूचना के. रा. पुरोहित यांनी मांडली. ती स्वीकारण्यात आली.

## ज्ञानप्रकाश लिमये परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष

संघटना स्थापन करण्याचं ठरलं पण संघटनेचं नाव काय असावं यावर बैठकीत तब्बल दोन तास काथ्याकूट झाला. अंतिमत: अनंत काणेकर यांनी संस्थेचं नाव मराठी पत्रकार परिषद असावं असं सूचवलं. त्यावर उपस्थितीतांची मत आजमाविली गेली. सर्वांना हे नाव मान्य होतं. आता वेळ घालविण्याची कोणाचीच तयारी नव्हती. ३ डिसेंबर १९३९ रोजी मुंबईतील 'विल्सन हायस्कूल'च्या प्रांगणात 'मुंबई मराठी साहित्य संमेलन भरविण्यात आलं होतं. तत्कालिन पत्रकारांमध्ये अनेकजण ज्येष्ठ साहित्यिक असल्यानं साहित्य संमेलनातच मराठी पत्रकार परिषद स्थापन करण्याचा ठराव संमत झाल्यानंतर परिषदेच्या पहिल्या कार्यकारिणीची निवडही याच संमेलनात गुप्त मतदान पध्दतीनं केली गेली. बारा उमेदवार होते. त्यापैकी वा. रा. ढवळे, र. धो. कर्वे, के. रा. पुरोहित, य. कृ. खाडीलकर, वरेरकर, का. म. ताम्हणकर, आप्पा पेंडसे यांची कार्यकारिणीवर निवड गेली. कार्यकारी मंडळ अस्तित्वात आल्यानंतर झालेल्या पहिल्याच बैठकीत सुंदर मानकर, द. पु. भागवत, आणि पालेकर यांना स्वीकृत सदस्य म्हणून कार्यकारी घेण्यात आलं. परिषदेचे पहिले अध्यक्ष म्हणून कार्यकारी मंडळान ज्ञानप्रकाश काकासाहेब लिमये यांची एकमतान निवड केली. तेच परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष झाले. कार्याध्यक्ष म्हणून भा. वि. वरेरकर यांची निवड केली गेली. स्वागताध्यक्ष नवाकाळचे संपादक य. कृ. खाडीलकर झाले. के. रा. पुरोहित हे मराठी परिषदेचे पहिले सरचिटणीस झाले. याच वेळी संघटनेच काम वाढविण्यासाठी आणि पुण्यात परिषदेच्या शाखा स्थापन करण्याचा आणि पुरोहितांनी पुण्यात पेंडसे यांनी मुंबईत परिषदेला अधिकाधिक पत्रकारांचा पाठिंबा मिळविण्यासाठी प्रयत्न करावा असे ठरले. तशी जबाबदारी त्या दोघांवर सोपविली गेली.

# तमाम पत्रकारांच्या मनातील विश्वास एस. एम. देशमुख है ना..!!!

## गेल्या ३ वर्षात परिषदेने केली जवळपास ७० लाख रूपयांची गरजू पत्रकारांना मदत

### राज्यातील पत्रकारांची सर्वात जुनी, सर्वात मोठी, सर्वसमावेशक एकमेव संघटना अर्थात ३६ जिल्हे अन् ३५८ तालुक्यात विस्तार

### ३ डिसेंबर १९३९ रोजी मुंबईत स्थापन झालेल्या परिषदेचा इतिहास रोमहर्षक आणि पत्रकारांच्या नव्या पिढीला प्रेरणा देणारा!

### वृत्तपत्र स्वातंत्र्यासाठी परिषद नेहमीच जागरूक, आक्रमक असून मोठी चळवळ उभी केल्याने पत्रकार संघटीत अन् निर्धास्त झाले!!

पत्रकारांचे हक्क आणि पत्रकारांच्या स्वाभिमानाच्या लढ्यात परिषद नेहमीच आक्रमक राहिली हे आपणास दिसेल. बिहार प्रेस बिलाचा विषय असो की नंतर राज्यात पत्रकारांवरील वाढत्या हल्ल्याचा विषय असो परिषद नेहमीच मुठी आवळत रस्त्यावर उतरलेली दिसेल. विशेषत: एस. एम. देशमुख २००० मध्येपरिषदेची सूत्रे हाती घेतल्यानंतर परिषद अधिकच आक्रमक झाली. नंतरच्या काळात अशक्य वाटणारा पत्रकार संरक्षण कायदा झाला. महाराष्ट्र हे देशातील पहिले आणि एकमेव असे राज्य आहे की, जेथे पत्रकारांना कायदेशीर संरक्षण आहे. या कायद्याचं श्रेय मराठी पत्रकार परिषद आणि एस. एम. देशमुख यांच्या नावावर आहे. या कायद्यासाठी राज्यातील पत्रकारांना बारा वर्षे संघर्ष करावा लागला. परिषदेच्या पाठपुराव्यामुळे राज्यातील पत्रकारांना पेन्शन मिळू लागले. निवृत्त पत्रकारांना ११,००० रूपये पेन्शन मिळते. बाळशास्त्री जांभेकर यांच्या सिधुदुर्ग येथील स्मारकाचा विषय देखील परिषद आणि सिंधुदुर्ग जिल्हा पत्रकार संघामुळे मार्गी लागला. शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण योजना केवळ परिषदेच्या पाठपुराव्यामुळे मार्गी लागली. त्याचा शेकडो गरजू पत्रकारांना लाभ मिळाला. मजिठियाचा विषय असो किंवा छोट्या वृत्तपत्रांच्या जाहिरात दराचा विषय असो, परिषदेने हे विषय हाती घेत निर्धाराने लावून धरले. सोडवले. वृत्तपत्र स्वातंत्र्यासाठी परिषद नेहमीच जागरूक आणि आक्रमक राहिली आहे. परिषदेने राज्यात मोठी चळवळ उभी केली असल्याने पत्रकार जसे संघटीत झाले तसेच ते निर्धास्त झाले. परिषद है ना..! हा विश्वास राज्यातील पत्रकारांच्या मनात निर्माण करण्यात परिषद यशस्वी झाली.

## ८२ वर्षांपासून निस्पृह, एक सेवा किंवा व्रत समजून काम करणाऱ्या पत्रकारांची 'टंचाई'!

दरम्यानच्या काळात वृत्तपत्र व्यवसाय आर्थिक संकटात सापडल्याने अडचणीत आला होता. कमालीचं अस्थैर्य आलं. पत्रकारांना मानसन्मानानं जगणं, केवळ कठिणच झालं असं नाही तर ते दुरापास्तही झालं. दुसरीकडं अभ्यासू, हाडाच्या पत्रकारांचीही उणिव भासायला लागली. निस्पृह भावनेनं पत्रकारितेला वाहून घेणारे पत्रकार दुर्मिळ झाले होते. (म्हणजे पत्रकारितेत निस्पृहपणे, एक सेवा किंवा व्रत समजून काम करणाऱ्या पत्रकारांची 'टंचाई' केवळ आजच भासते आहे असं नाही तर ८२ वर्षांपूर्वी देखील हीच परिस्थिती होती, ध्येयवादी मंडळींची पत्रकारितेला तेव्हाही गरज होती. आजही आहे.) माध्यमांसमोरील या अडचणी आणि इंग्रज सरकारकडून वेगवेगळे कायदे करून माध्यमांची होणारी मुस्कटदाबी यामुळं सारी वृत्तपत्रसृष्टीच त्रस्त झाली होती. वृत्तपत्र व्यवसायावर सातत्यानं व्यवस्थेकडून होणारा अन्याय आणि आर्थिक अस्थैर्यामुळं आलेलं नैराश्य दूर करून परत एकदा वृत्तपत्र व्यवसायाला नवी उभारी देण्यासाठी सर्वांनी एकत्र येणं, संघटीत प्रयत्न करणं गरजेचं होतं. तशी गरजही पुन्हा एकदा सर्वांनाच जाणवायला लागली होती. त्या अंगाने प्रयत्नांनीही मग वेग घेतला.



राज्यातील पत्रकारांची मातृसंस्था
मराठी पत्रकार परिषद
मराठी पत्रकारांची पहिली आणि सर्वसमावेशक एकमेव संघटना.

## १९३३ मध्ये पुण्यात संपादकांचं एक संमेलन भरविण्यात आलं!!

● महाराष्ट्रात मराठी पत्रकारांची आर्थिक, बौध्दिक आणि वैचारिक उन्नती व्हावी यासाठी एखादी संघटना असावी असा एक विचार स्वातंत्र्याच्या बराच अगोदर तत्कालिन पत्रकारांच्या समोर आला. त्याला मूर्त स्वरूप देता यावं यासाठी १९३३ मध्ये पुण्यात संपादकांचं एक संमेलन भरविण्यात आलं होतं. त्यासाठी गोपाळराव ओगले यांनी पुढाकार घेतला होता. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी देखील तेच होते. संमेलनाचा त्यावेळी मोठा गाजावाजा झाला मौजनं तर खास विशेषांकही काढला. तात्यासाहेब केळकर यांच्यासारख्या ज्येष्ठांचा संमेलनात सहभाग होता. तथापि ज्या उद्देशानं हे संमेलन भरविण्यात आलं होतं तो उद्दश काही सफल झाला नाही. पत्रकार संघटना स्थापनेच्यादृष्टीन काहीही निर्णय होऊ शकला नाही. याची अनेक कारणं आहेत. त्यापैकी एक म्हणजे, ओगले यांच्या भाषणात संयुक्त 'महाराष्ट्राच्या कल्पनेचं बिजारोपण केलेलं होतं. मुख्य मुद्दा सोडून उपस्थित झालेला हा विषय अनेकांना आवडला नाही. त्यामुळे मंडळी जमली, वेगवेगळ्या विषयावर चर्चा करून निघून गेली. त्याकाळी मुंबईत पत्रकारांची अशी मासिक संमेलन भरत. पुण्यातल्या या संमेलनाला मुंबईतील पत्रकारांच्या मासिक संमेलनासारखंच स्वरूप आलं होतं. त्यामुळं या संमेलनाची चर्चा झाली पण विषय चर्चेवरच थांबला. कालांतराने विषय लोकांच्या विस्मृतीतही गेला. पाच-सहा वर्षे मग काहीच झालं नाही. ती वर्षे अशीच गेली.



**अनिल वाघमारे**
प्रदेशाध्यक्ष, डिजिटल मिडिया परिषद, महाराष्ट्र राज्य

## देशभरातील ९ हजारांवर मराठी पत्रकार परिषदेशी जोडले गेले!!

● मराठी पत्रकार परिषद ही महाराष्ट्रातील पत्रकारांची सर्वात जुनी, सर्वात मोठी, सर्वसमावेशक अशी एकमेव संघटना आहे. राज्यातील ३६ जिल्हे आणि जवळपास सर्वच म्हणजे ३५८ तालुक्यात परिषदेचा शाखा विस्तार झालाय. दिल्ली, पणजी, हैदराबाद, विजापूर, बेळगाव, निपाणी सह अन्य काही राज्यातील शहरातही परिषदेच्या शाखा कार्यरत आहेत. देशभरातील ९ हजारांवर मराठी पत्रकार परिषदेशी जोडले गेलेले आहेत. सर्वच सदस्यांचं परिषदेवर निस्सीम प्रेम आहे. म्हणूनच राज्यातील पत्रकार परिषदेला आपली मातृसंस्था मानतात. ३ डिसेंबर १९३९ रोजी मुंबईत स्थापन झालेल्या परिषदेचा इतिहास रोमहर्षक आणि पत्रकारांच्या नव्या पिढीला प्रेरणा देणारा आहे.

● पत्रकारितेत ज्यांनी उल्लेखनिय कार्य केलेलं आहे असे अनेक मान्यवर आणि नामंवत संपादक, पत्रकार मराठी पत्रकार परिषदेशी जोडले गेलेले होते. परिषदेच्या स्थापनेतही त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यातील अनेक जण परिषदेचे अध्यक्षही होते. मराठी पत्रकार परिषदेच्या प्रत्येक सदस्यांसाठी ही बाब अभिमानास्पद आहे.

## पुढील काळात अधिक प्रभावीपणे काम करण्याचा परिषदेचा निर्धार!!

● मराठी पत्रकार परिषद केवळ हक्कासाठीच लढणारी संघटना नाही तर परिषद हे कुटुंब समजून गरजू पत्रकारांना मदतीचा हात पुढे करताना परिषदेने कधी आखडता हात घेतला नाही. कोरोना काळ असो की, त्याच्या अगोदरचा काळ परिषद खंबीरपणे पत्रकारांबरोबर राहिली. गेल्या ३ वर्षात परिषदेने जवळपास ७० लाख रूपयांची मदत गरजू पत्रकारांना केली. कोरोना काळात पुण्यात जीवनावश्यक वस्तू सर्वच सदस्यांना देण्यात आल्या. अन्यत्रही कोरोना काळात पत्रकारांना मोठी मदत दिली गेली. त्यामुळे परिषदेबद्दल विश्वास आणि आपुलकीचे वातावरण राज्यात निर्माण झालेले आहे. आज राज्यात मराठी पत्रकार परिषदच ही अशी एकमेव संघटना आहे की, जी कायम पत्रकारांबरोबर आहे. परिषद हे आपले कुटुंब समजते. हे कुटुंब अधिक व्यापक व्हावं यासाठी पुढील काळात अधिक प्रभावीपणे काम करण्याचा परिषदेचा निर्धार आहे.

## अशी झाली सरकारच्या प्रांतिक वृत्तपत्र सल्लागार समितीवर परिषदेच्या प्रतिनिधीची नियुक्ती

● मराठी पत्रकार परिषदेची स्थापना झाली. पुणे आणि मुंबईतील शाखांचे काम जोरात सुरू झालं. राज्यातील पत्रकारही परिषदेच्या झेंड्याखाली एकत्र आले. परिषदे निमित्तानं मराठी पत्रकार प्रथमच एकत्र आले होते. पत्रकार संघटीत झाल्यामुळे सरकारच्या प्रांतिक वृत्तपत्र सल्लागार समितीवर परिषदेचा एक प्रतिनिधी घेतला जावा, अशी मागणी केली गेली. ती सरकारला मान्य करावी लागली य. कृ. खाडीलकर यांची पहिले प्रतिनिधी म्हणून समितीवर नेमणूक केली गेली. परिषदेच्या काही बैठका पुण्यात तर काही मुंबईत घेतल्या गेल्या. त्यात पत्र सल्लागार समितीवर मराठीचा आणखी एक प्रतिनिधी असला पाहिजे अशी मागणी करण्यात आली. ती ही मान्य केली गेली. समितीवर कोणाला पाठवायचे यासाठी निवडणूक घेतली गेली. त्यात काकासाहेब लिमये यांना पुण्यातर्फे पाठविण्याचं ठरलं.

## परिषदेचा लढाऊबाणा पुढच्या काळात आणि आजतागायत कायम!

● परिषदेचं पहिलं अधिवेशन मुंबईत तर दोन वर्षांनी परिषदेचं दुसरं अधिवेशन १८ मे १९४१ रोजी पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात घेण्यात आलं. पहिल्या अधिवेशनाप्रमाणंच अध्यक्षपदासाठी निवडणूक घेण्यात आली. त्यात अध्यक्ष म्हणून न. र. फाटक यांची निवड झाली. केसरीचे संपादक तात्यासाहेब करंदीकर हे स्वागताध्यक्ष होते. पुण्याच्या अधिवेशनात विविध ठराव संमत झाले. पहिल्या आणि दुसऱ्या अधिवेशनाच्या काळात अनेक घडामोडी घडल्या होत्या, रत्नागिरीत भरलेल्या साहित्य समेलनाच्या अध्यक्ष पदावरून बोलताना ना. सी. फडके यांनी पत्रव्यवसायावर आणि संपादक, उपसंपादकांवर सपाटून टीका केली होती. या संमेलनास पत्रकार परिषदेचे सरचिटणीस पुरोहित तसेच पेडसे उपस्थित होते. अध्यक्षांनी वृत्रपत्रसृष्टीवर केलेली टीका या दोघांना मान्य होणं शक्य नव्हतं. या दोघांनी तसेच संमेलनास उपस्थित असलेल्या अन्य पत्रकारांनी फडके यांच्याकडे जाहीर चर्चेची मागणी केली. मात्र अध्यक्षांनी ती धुडकावून लावल्यानं विषय नियामक सभेत आला. तेथे अध्यक्षांच्या विरोधात निंदाव्यंजक ठराव मांडण्यात आला. तो ठराव संमत झाला नाही हे जरी खरं असलं तरी साहित्य संमेलनाच्या इतिवृत्तांत त्याची नोंद घ्यावी लागली. एवढं सारं रामायण घडल्यानंतर समारोपाच्या कार्यक्रमात फडके काहीसे नरमले आणि आपली तक्रार सर्वच पत्रकारांबद्दल नसून काहींबद्दल आहे' अशी आजच्या नेत्याला शोभेल अशी टिप्पणी त्यांनी केली. काही म्हणजे नेमक्या कोणत्या यावर मात्र ते काही बोलले नाहीत किंवा कोणत्या वर्तमानपत्राचं नावही ते घेऊ शकले नाहीत. या घटनेचे पडसाद मराठी पत्रकार परिषदेच्या पुण्यातील अधिवेशनात उमटणे स्वाभाविक होते. त्यावर जोरदार चर्चा झाली. पुरोहित आणि पेंडसे यांनी फडके याच्या वक्तव्याला रत्नागिरीत जोरदार आक्षेप घेऊन 'कारण नसताना कोणी पत्रकारांना डिवचले तर आम्ही ते खपवून घेणार नाही. त्याला तीव्र प्रतिकार करू आणि प्रसंगी जश्यास तसे उत्तर देऊ' हे दाखवून दिलं. परिषदेचा हा लढाऊबाणा पुढच्या काळात आणि आजतागायत कायम राहिला.

## अधिवेशनास 69 नियतकालिकांचे प्रतिक मिळून 110 पत्रकार उपस्थित

● मुंबईसाठी मुंबई पत्रकार परिषद स्थापन करावी असा ठराव पुरोहितांनी मांडला. या ठरावासह काळे आणि मुंबई उपनगर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आचार्य अत्रे यांनी पाठिंबा देत हा ठराव संमत केला गेला. परिषदेच्या या अधिवेशनास ६९ नियतकालिकांचे प्रतिक मिळून ११० पत्रकार उपस्थित होते. यावेळी इतरही काही ठराव संमत झाले. अशा प्रकारे ३ डिसेंबर १९३९ रोजी मराठी पत्रकार परिषदेची अधिकृतरित्या स्थापना झाली.

## अशी होती कार्यकारिणी

काकासाहेब लिमये यांनी १९३९ पासून पुढील अधिवेशनापर्यंत एका कार्यकारी मंडळाची निवड केली. पत्रकार परिषदेच्या या मध्यवर्ती मंडळात अधयक्ष कृ. ग. लिमये, उपाध्यक्ष शं. बा. किर्लोस्कर व त्र्यं. र. देवगिरीकर यांच्यासह एकूण सोळा सभासद होते. पुरोहित आणि रा. गो. कानडे हे सरचिटणीस होते. मुंबई शाखेचे पहिले अध्यक्ष म्हणून अनंत काणेकर यांची निवड केली गेली होती. चिटणीस द. पु. भागवत होते अन्य नऊ सभासद होते. दा. वि. गोखले हे पुणे शाखेचे पहिले अध्यक्ष होते. दि. वा. दिवेकर चिटणीस होते. तसेच अन्य दहा सदस्य कार्यकारिणीत होते.